जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# Admission process for distance education courses in progress

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Centre for Distance Education (CDE) of the Shivaji University, Kolhapur (SUK), has invited applications for admission to various courses.

The application process, according to the varsity circular, will conclude on August 4; a late fee will be charged of students seeking admission after August 4, till August 10. A hiked late fee will come into effect after August 10, till August 16.

Students can apply for the BA, BCom, MA, MCom, MBA, MSc (mathematics), public administration and PG diploma in translation courses, along with a host of others.

A varsity official said, "CDE courses could be done by those who due to employment, business or financial issues could not complete their education. Students who have not got admission to colleges can also also apply. These courses are also often taken by candidates applying for competitive examinations while applying for jobs."

Students can visit a study centre close to them to know about the admission process and availability of seats in courses of their choice. There are study centres at various locations in Sangli, Satara and Kolhapur districts.

University officials said detailed information about the admission process and the courses can be found on the website: www.unishivaji.ac.in.



## Facts and figures

- Number of courses available at CDE: Around **10**
- Number of study centres in division: **77**
- Number of studey centres to be formed this year-**11**
- Students pursuing education: Over **20,000**
- Application process on till- **August 4**
- Admissions with late fee- till **August 16**

## Varsity dispatches 11k pending certificates

**Kolhapur:** Shivaji University, Kolhapur (SUK) has dispatched over 11,000 degree certificates which had not been distributed earlier as there was a printing issue. Director Mahesh Kakade of the Board of Examinations and Evaluation, SUK, told TOI that they had joined hands with rail mail for bulk delivery of the certificates, after printing was finished.

"With this association we have managed to deliver around 11,000 pending certificates to students," Kakade said, adding that there are no certificates from the 2018 convocation ceremony that are yet to be dispatched.

Kakade said there were around 26,000 degree certificates that were supposed to be distributed in absentia at this year's convocation ceremony in March. However, technical difficulties hindered the printing of 11,000 degree certificates.

Another varsity official said that there was also an option for students to collect the certificate in person from the varsity campus by producing valid ID and documents. It has to be noted that this year for the 54th convocation ceremony at the university, over 20,000 degree certificates had been printed in the new format. However, due to various internal miscommunication among top authorities and disagreement over the new format, the varsity had to reprint around 24,000 degree certificates overnight, just a day before the convocation ceremony on March 19, sources from the varsity said.

In the new format, the certificates contain the signature of only the vice chancellor. Earlier, the registrar's signature would also be on these certificates. There was confusion over the changed format, and ultimately the old format was retained.

Ultimately, the varsity just scrapped the new certificates and reprinted certificates in the old format. That had also caused errors to creep in, some sources said.

Various student bodies have demanded an inquiry into the issue, after which vice-chancellor Devanand Shinde last week appointed a three-member committee to investigate this U-turn by the university. The committee will submit its findings in three months. TNN

CDE offers courses for around 10 programmes including professional ones in 77 study centres across Sangli, Satara and Kolhapur districts. There are over 20,000 students studying in CDE under various programmes.

Varsity officials said 11 new study centres will begin to function this academic year.

Officials clarified that those already enrolled for a degree elsewhere cannot apply for the distance mode and pursue both programmes simultaneously.

लोकमत

# कोल्हापूरचा अभिमान जागृत ठेवणारा शास्त्रज्ञ

## आर. व्ही. भोसले यांचा जीवनपट शब्दबद्ध; 'स्मृतितरंग' पुस्तकाचे आज प्रकाशन

ज्येष्ठ अवकाश संशोधक डॉ. आर. व्ही. भोसले यांच्या जीवनावर आधारित पी. टी. पाटील यांच्या



'स्मृतितरंग' या पुस्तकाचे प्रकाशन आज, मंगळवारी दुपारी चार वाजता महालक्ष्मी सांस्कृतिक हॉलमध्ये शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते होणार आहे. त्यानिमित्त डॉ. भोसले यांच्या कार्याचा घेतलेला हा आढावा...




डॉ. आर. व्ही. भोसले हे आंतरराष्ट्रीय पातळीवरचे खगोल व अवकाश विज्ञानातील संशोधक, भारतात 'पहिला रेडिओ टेलिस्कोप तयार करणारे शास्त्रज्ञ' असा उल्लेख करताना आम्हाला अभिमान वाटतो आणि ते कोल्हापूरचे आहेत म्हणून आमचा अभिमान द्विगुणित होतो.

बस्तवडे (ता. कागल) हे त्यांचे मूळ गाव. आजोळ असणाऱ्या सोनाळी (ता. भुदरगड) येथे त्यांचा जन्म झाला. वडील शेतकरी कुटुंबातले. पण, तत्कालीन व्हर्नॅक्युलर परीक्षा पास झालेले. आई ईश्वरवादी भाविक वृत्तीची. डॉ. भोसले यांना तीन बंधू - सखाराम, तुकाराम, पांडुरंग. डॉक्टरसाहेबांच्या शिक्षणाचा सर्व भार त्यांच्या बंधूंनी पेलला. अहमदाबादला डॉ. विक्रम साराभाईंनी फिजिकल रिसर्च लॅबोरेटरी स्थापन केली. हवामान शास्त्रज्ज्ञ डॉ. प्रा. आर. के. रामनाथन यांना तेथे डायरेक्टर म्हणून घेतले. डॉ. रामनाथन हे डॉ. भोसले यांचे गुरु. पीएच.डी चा अभ्यास करताना डॉ. भोसले यांनी स्वत: रेडिओ टेलिस्कोप तयार केला. तो भारतातला पहिला रेडिओ टेलिस्कोप ठरला. त्याद्वारे त्यांनी आकाशगंगेतून उद्भवणाऱ्या रेडिओ लहरींचा अभ्यास केला. सन १९६१ मध्ये ते पोस्ट डॉक्टरल फेलो म्हणून कॅनडामध्ये त्यांनी सोलर रेडिओ पोलॅरिमीटर तयार केला. त्यानंतर अमेरिकेमध्ये त्यांनी 'सॅटेलाईट स्टडीज ऑफ दि आयनास्फिअर', 'गुरु ग्रहाचे रेडिएशन व पोलरायझेशन' या विषयावर संशोधन केले. डॉ. विक्रम साराभाई व प्रा. रामनाथन यांच्या आवाहनाला मान देऊन ते भारतात परत आले. ते सधन कुटुंबातील नव्हते व त्यांना कोणी 'गॉडफादर'ही नव्हता. कोल्हापूरबाबतचा अभिमान त्यांनी जागृत ठेवला.

शिवाजी विद्यापीठात सन १९९० मध्ये भौतिकशास्त्र विभागात एम.एस्सी. साठी अवकाशशास्त्र अभ्यासक्रम सुरू करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. मानधन न घेता २८ वर्षे त्यांनी ज्ञानदानाचे काम केले. त्यांनी राजाराम महाविद्यालयात पदवी स्तरावर अवकाश शास्त्र हा विषय, पन्हाळागडावर शिवाजी विद्यापीठातर्फे अवकाश संशोधन केंद्र सुरू केले. तिरुपती विद्यापीठाच्या सहकार्याने 'इस्रो'चे एक युनिट एम. एस. टी. रडार व डॉ. भटनागर यांच्या सहकार्याने पी.आर.एल.ची उदयपूरला सौर वेधशाळा स्थापनेमध्ये योगदान दिले. भावीपिढीला त्यांचे कार्य, विचार माहीत करून देण्याचा प्रयत्न 'स्मृतितरंग'द्वारे केला आहे.

- पी. टी. पाटील,
सेक्रेटरी, कुंभी-कासारी
शिक्षण प्रसारक मंडळ, कुडित्रे.

# गोरे, पाटील, वनमोरे यांचा सत्कार

कोल्हापूर: 'सहकाराच्या माध्यमातून निवारा चळवळ व बँकिंगच्या माध्यमातून अर्थव्यवस्थापन करणाऱ्या रवळनाथ को ऑप. सोसायटीने सामाजिक बांधिलकी जपली. संस्थेच्यावतीने विविध क्षेत्रातील गुणीजनांच्या गौरवाची परंपरा प्रेरणादायी आहे,' असे गौरवोद्गार शिवाजी विद्यापीठाचे उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी काढले.

रवळनाथ को ऑप. हाउसिंग फायनान्स सोसायटीच्या कोल्हापूर शाखेत युवा साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त नवनाथ गोरे, उत्कृष्ठ संशोधक अभ्यासक पुरस्कार मिळाल्याबद्दल डॉ. पी. एस. पाटील, निवृत्तीबद्दल प्रा. हरी वनमोरे यांच्या सत्काररप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे शैक्षणिक सल्लागार प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे होते.



युवा साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखक नवनाथ गोरे यांचा रवळनाथ हाउसिंग सोसायटीतर्फे उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते सत्कार झाला. यावेळी अध्यक्ष एम. एल. चौगुले आणि संचालक.

कोल्हापूर शाखा चेअरमन प्रा. आर. एस. पाटील, प्राचार्य डॉ. एच. व्ही. देशपांडे, प्रा. डॉ. ए. एम. गुरव, कोल्हापूर शाखा सल्लागार भास्कर सांगावकर, डॉ. सतीश घाळी, प्रा. डॉ. आण्णासाहेब कलगोंडा, कोल्हापूर शाखाधिकारी पंकज कुंभार उपस्थित होते

'रवळनाथ'चे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी स्वागत केले. गडहिंग्लज शाखा सल्लागार प्रा. डॉ. दत्ता पाटील यांनी सूत्रसंचलन केले, प्रा. डॉ. एस. बी. भांबर यांनी आभार मानले.

# तैवान शिष्टमंडळाची सेंट झेवियर्सला भेट

कोल्हापूर : तैवानच्या क्रीडा विद्यापीठाचे त्रिसदस्यीय शिष्टमंडळाने सेंट झेवियर्स हायस्कूलला भेट देऊन शाळेच्या क्रीडा कामगिरीची दखल घेतली. यामध्ये तैवानचे विद्यापीठ क्रिडाध्यक्ष प्रा. झुएँग, प्रा. सिएँग यु यांचा समावेश होता. शिवाजी विद्यापीठासह परिसरातील क्रीडाविषयक सोयी सुविधांची पाहणी करण्यासाठी शिष्टमंडळ तीन दिवसांच्या भेटीवर आले होते. सेंट झेवियर्सचे मुख्याध्यापक फादर जेम्स थोरात, व्यवस्थापक फादर डेनिस बोर्जीस यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी मानवंदना दिली.

यावेळी अनिल धुले, फुटबॉल प्रशिक्षक अभिजित वणिरे, ब्रदर राजा. एस, पर्यवेक्षिका बेनिता मंतेरो, एन. सी. सी. ऑफिसर अँथोनी डिसोझा, क्रीडा शिक्षक मोहन लोहार, किरण साळोखे, अल्ताफ कुरेशी, प्रवीण आवळे, विकास कुलकर्णी, जाई भागवत, सुशीला दराडे आदी उपस्थित होते.

# शोभिवंत मासे संगोपनातून रोजगाराच्या नव्या संधी

## डॉ. एस. टी. शारंगधर : शिवाजी विद्यापीठात कार्यशाळा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शोभिवंत माशांच्या संगोपनाद्वारे स्वत: रोजगाराच्या नव्या संधी निर्माण करून दुसऱ्यांनाही रोजगार देता येणे शक्य आहे, असे प्रतिपादन मत्स्य विद्यालय, रत्नागिरीचे प्रा. डॉ.एस. टी. शारंगधर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ प्राणीशास्त्र विभाग, मत्स्य महाविद्यालय, रत्नागिरी, डॉ. बाळासाहेब सावंत कृषी विद्यापीठ दापोली यांच्या संयुक्त विद्यमाने 'शोभिवंत माशांचे प्रजनन, संगोपन आणि त्यांचे व्यवस्थापन' या विषयावर विद्यापीठात आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते. प्रा. शारंगधर यांनी मत्स्य पालनासाठी निर्माण करावयाच्या टाक्या, काळजी याची प्रात्यक्षिकासह माहिती दिली. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, अशा प्रकारचे मूल्यावर्धित कौशल्यावर आधारित रोजगार निर्मितीचे कार्यक्रम सातत्याने सुरू ठेवणे गरजेचे आहे.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात शोभिवंत माशांचे संगोपन या विषयावरील कार्यशाळचे दीपप्रज्वलन करून उद्घाटन करताना प्रा. बी. आर. चव्हाण, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. पी. एस. पाटील आदी. (छाया : पप्पू अत्तार)

प्रा.डॉ.पी.डी.राऊत म्हणाले, प्राणीशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच डेअरी, पोल्ट्री, मत्स्यव्यवसाय, रेशीम उद्योग अशा रोजगाराची व्यवसाय कौशल्ये आत्मसात करून घ्यावीत. डॉ. पी.एस. पाटील म्हणाले, नेहमीच्या मूलभूत विज्ञानाच्या पलीकडे जाऊन विद्यार्थांनी कौशल्य विकसित करण्याची गरज आहे. दुपारच्या सत्रात प्रा. बी. आर. चव्हाण यांनी माशांच्या जाती, त्यांचे खाद्य, प्रजनन यांची माहिती दिली. प्राणीशास्त्र विभागप्रमुख डॉ. एम.व्ही. मन्ने यांनी कार्यशाळा आयोजनबद्दल हेतू विशद केला. पाहुण्यांची ओळख डॉ.ए.डी.जाधव यांनी करून दिली. कार्यक्रमसमन्वयक डॉ. एम. पी. भिलारे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. ए. ए. देशमुख, डॉ. एस. एम.गायकवाड, डॉ. एन. ए. कांबळे आदी उपस्थित होते.

# दूरशिक्षण केंद्रातर्फे प्रवेश प्रक्रिया सुरू

**कोल्हापूर, ता. २३ :** शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्रातर्फे पदवी व पदव्युत्तर पदवीसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज www.unshivaji.ac.in वेबसाईटवर Distance Education लिंकवर उपलब्ध आहेत.

प्रवेश प्रक्रियेत बीए, बीकॉम, एमए, (भाषा/सामाजिकशास्त्र) एमए जैनॉलॉजी आणि प्राकृत, लोकप्रशासन, एमकॉम, एमएस्सी (गणित), पीजी डिप्लोमा इन ट्रान्सलेशन या अभ्यासक्रमांचा समावेश आहे. प्रवेशप्रक्रिया द्वितीय व तृतीय वर्षाचे फ्रेश व पुनर्परीक्षार्थींचे प्रवेश व परीक्षा अर्ज यांच्यासाठी आहे. ज्या



विद्यार्थ्यांना द्वितीय/तृतीय वर्षाला प्रवेश द्यायचा आहे, त्यांनी online.unshivaji.ac.in संकेतस्थळावर आपला यूजर आयडी, पासवर्ड वापरून आपल्या प्रोफाईलमधून प्रवेश व परीक्षा अर्ज भरावा. त्यानंतर जर विद्यार्थी पूर्वीच्या सत्र परीक्षेसाठी पुनर्परीक्षार्थी असेल तर त्यांनी त्यांच्या प्रोफाईलमध्ये तयार असलेला परीक्षा अर्ज भरावा.

केंद्रीय मानव संसाधन मंत्रालयाच्या वतीने मोफत स्वयंम कोर्सेस सुरू केले असून 'कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी इन एज्युकेशन' अभ्यासक्रमासाठी नाव नोंदणी करण्यात यावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

## अभ्यासक्रमांबाबत

- नव्या ११ अभ्यास केंद्रांना मान्यता
- नियमित व दूरशिक्षण केंद्राची पदवी एकाच वेळी नाही
- बीए, बीकॉम भाग १ साठी लोकशाही सुशासन आणि प्रशासन विषय
- प्रवेशप्रक्रियेसाठी ऑनलाईन पेमेंट सुविधा
- स्वयंम कोर्सेसना मिळणार प्रवेश.

## प्रवेश व पुनर्परीक्षार्थी अर्ज भरण्याच्या तारखा

- विनाविलंब शुल्कसह - ४ ऑगस्ट
- विलंब शुल्कासह (५० रुपये) - १० ऑगस्ट
- अतिविलंब शुल्कासह (५० + ३०० रुपये) - १६ ऑगस्टपर्यंत